**दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षेंतर्गत विवाह प्रोत्साहन योजना.**

**महाराष्ट्र शासन**

**दिव्यांग कल्याण विभाग**

**शासन निर्णय, क्रमांक : दिव्यांग-२०२५/प्र.क्र.१७/E-१३७६८६४/कार्यासन-६**

३१,३२,३५ ए, तिसरा मजला, ए-विंग, मित्तल टॉवर,

नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

दिनांक :- १८ डिसेंबर, २०२५

<u>वाचा</u> :- १) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६

२) दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, २०१७

३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.: दिव्यांग २०१३/प्र.क्र.१०३/अ.क.२ दि. १७ जून, २०१४.

**प्रस्तावना:-**

भारतीय समाजात दिव्यांग व्यक्तींच्या विवाहाबाबतचा दृष्टीकोन अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांवर आधारित असल्याने तो दिव्यांग व्यक्तींच्या आयुष्यावर दीर्घ परिणाम करतो. दिव्यांगत्वाबाबत असलेल्या पूर्वग्रहामुळे अनेकदा दिव्यांगत्व हे असमर्थता किंवा अधिकारहीनता म्हणून पाहिले जाते. यास्तव हा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तीचा विवाह म्हणजे पालकांच्या दृष्टीने सामाजिक जबाबदारी असल्याने, वंशपरंपरेत दिव्यांगत्व येईल म्हणून विवाह टाळला जातो अथवा विजोड (वयस्क, घटस्फोटित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल) जोडीदार दिला जातो. विवाहासंदर्भात दिव्यांग महिलांना महिला आणि दिव्यांग अशा दुहेरी भेदभावाला सामोरे जावे लागते. परिणामी अनेक दिव्यांग महिला विवाहापासून वंचित राहतात.

सर्वसामान्य व्यक्ती आणि दिव्यांग व्यक्ती यांच्यात शिक्षण, रोजगार, विज्ञान-तंत्रज्ञानाचा दैनंदिन जीवनातील वापर यामुळे जागरुकता वाढत असून, दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी शासन, दिव्यांग कल्याण क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्था प्रयत्नशील आहेत. दिव्यांग व्यक्तीही आत्मनिर्भर बनून स्वत:च्या आयुष्याचे निर्णय अधिक आत्मविश्वासाने घेत आहेत.

दिव्यांग व्यक्तींचा विवाह ही एक संवेदनशील बाब असून, सामाजिक समतेच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबाकडून दिव्यांग व्यक्तीच्या विवाहाचा सहज स्वीकार,

त्यामुळे त्यांना प्राप्त होणारे कौटुंबिक, भावनिक, मानसिक आणि सामाजिक स्थैर्य विचारात घेऊन दिव्यांग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन अनुदान योजना शासन निर्णय, दिनांक १७ जून, २०१४ अन्वये सुरु केली आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम १० अन्वये दिव्यांग व्यक्तींना प्रजननाचा हक्क आणि कुटुंब नियोजनचे अधिकार आहेत. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २४ मध्ये "शासन आपल्या आर्थिक क्षमतेच्या आणि विकासाच्या मर्यादेत, दिव्यांग व्यक्तींना समाजात स्वतंत्रपणे राहता यावे, त्यांना पुरेसा राहणीमानाचा दर्जा मिळावा आणि त्यांच्या अधिकाराचे रक्षण करुन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक योजना आणि कार्यक्रम तयार करेल" असे नमुद केले आहे. त्यानुसार वाचा क्र.३ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन दिव्यांग-अव्यंग विवाह योजनेत कालानुरूप बदल करण्याची व दिव्यांग-दिव्यांग विवाह हा पर्याय नव्याने समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

दिव्यांग-अव्यंग विवाह योजनेच्या प्रोत्साहन अनुदानात वाढ आणि दिव्यांग-दिव्यांग हा घटक नव्याने समाविष्ट करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

(१) या योजनेतंर्गत पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील:-

| | |
|---|---|
| दिव्यांग-अव्यंग विवाह | रुपये १,५०,०००/- |
| दिव्यांग-दिव्यांग विवाह | रुपये २,५०,०००/- |

(२) अनुदानाची पूर्ण रक्कम पती व पत्नीच्या संयुक्त बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे जमा करण्यात येईल.

(३) त्यापैकी ५० टक्के रक्कम संबंधित दाम्पत्याने ५ वर्षाकरिता मुदत ठेवीमध्ये ठेवावी.

२. योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

i. वधू अथवा वराकडे दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्वाचे आधारसंलग्न वैध वैश्विक ओळखपत्र (UDID) आवश्यक आहे.
ii. दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
iii. विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा तसेच वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.
iv. विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.

v. विवाह झाल्यानंतर एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

३. **आवश्यक कागदपत्रे** :-

i. आधारसंलग्न वैध वैश्विक ओळखपत्र (UDID) दिव्यांगत्व प्रमाणपत्र

ii. विवाह नोंदणी प्रमाणपत्र

iii. आधार कार्ड

iv. पती व पत्नीच्या आधारसंलग्न संयुक्त बँक खात्याचा सविस्तर तपशील (बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत )

v. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र

४. **अर्ज करण्याची प्रक्रिया-:**

लाभार्थ्यांनी शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या नमुन्यामध्ये व आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडल्याची पूर्ण खात्री करुन परिपूर्ण अर्ज जिल्हा कार्यालयाकडे सादर करावेत. जिल्हा कार्यालयाकडून अर्जांची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

५. **निवड समिती:-**

सदर योजनेच्या लाभार्थी निवडीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. निवड समितीची रचना पुढीलप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **अधिकारी** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २. | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ३. | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | सदस्य |
| ४. | सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य |
| ५. | दिव्यांग कल्याण विभागाचा जिल्हास्तरीय अधिकारी | सदस्य सचिव |

सदस्य सचिव समितीने मान्य केलेल्या पात्र लाभार्थ्यांची यादी मान्यतेसाठी आणि निधीच्या मागणीसाठी आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचेकडे सादर करतील.

६. सदर योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना आयुक्त, दिव्यांग कल्याण विभाग यांचेमार्फत अनुदानाची पूर्ण रक्कम पती व पत्नीच्या संयुक्त बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे जमा करण्यात येईल.

७. या योजनेतंर्गत प्रत्येक आर्थिक वर्षात प्राप्त होणारे अर्ज, त्या-त्या आर्थिक वर्षात निकाली काढणे सर्व जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यासाठी अनिवार्य आहे. सर्व जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद हे प्राप्त झालेल्या अर्जाची योग्य ती छाननी तो प्राप्त झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांत करतील.

८. या योजनेतंर्गत दिव्यांग-अव्यंग विवाह योजनेच्या अर्थसहाय्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना सोबतच्या **परिशिष्ट "अ"** व दिव्यांग-दिव्यांग विवाह योजनेच्या अर्थसहाय्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना **परिशिष्ट "ब"** येथे जोडण्यात आलेला आहे. या अर्जातील सर्व बाबी पूर्ण असल्याशिवाय जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अर्जाचा स्वीकार करु नये. अर्जामध्ये काही त्रुटी/काही कागदपत्रे कमी असल्याचे आढळून आल्यास संबंधित अर्जदाराला तात्काळ त्याठिकाणी सांगण्यात यावे. एकदा जर अर्जदाराकडून अर्ज प्राप्त करून घेतला तर याचा अर्थ अर्जदारांनी दिलेली सर्व माहिती बरोबर आहे व संबंधित अधिकाऱ्यांनी/ कर्मचाऱ्यांनी ही माहिती पाहून व कागदपत्रांची पाहणी करुन हा अर्ज स्विकारलेला आहे असे समजण्यात येईल.

९. सदर योजनेचे नियंत्रण अधिकारी हे आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राहतील.

१०. या बाबींवरील खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०२५२-६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा-:

**मागणी क्र. झेडआय-३**

२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण,
०२ समाज कल्याण,
१०१ अपंगांचे कल्याण,
(०५) दिव्यांगांसाठी इतर योजना,
(०५) (१५) दिव्यांग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना (मुंबई शहर व उपनगरे) (कार्यक्रम) (२२३५ D२३९)
५०, इतर खर्च.
(०५) (१६) दिव्यांग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना (मुंबई शहर व उपनगरे वगळून) (कार्यक्रम) (२२३५ D२४८)
५०, इतर खर्च.

११. कोणत्याही लाभार्थ्याने या योजनेचा लाभ दोन वेळा घेऊ नये यासाठी लाभार्थ्यांची यादी वेळोवेळी अद्ययावत करावी.

१२. माहे ऑक्टोबर व माहे एप्रिलच्या पहिल्या आठवडयात सर्व जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्वाक्षरीने सोबतच्या परिशिष्ट "क" येथे नमूद केलेली माहिती आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावी. सर्व जिल्हयांची संकलित केलेली जिल्हानिहाय एकत्रित माहिती आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी शासनास सादर करावी.

१३. सदर सुधारित योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सुरु होईल.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०२५१२१८१५२६२५११३५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUKARAM H MUNDHE

Digitally signed by TUKARAM H MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=D60C97125DD88B1F415C73CDEF592D0F67518BBD8BA278837219A7B9D7324AEC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=57B59F48D85074D9EA4B3BACF05E19E7030E9F2B74772901E229A4BAE0497214, cn=TUKARAM H MUNDHE
Date: 2025.12.18 15:27:40 +05'30'

**(तुकाराम मुंढे)**

**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.सर्व जिल्हाधिकारी,